# रोजगार हमी योजना समितीची माहिती

## :: पार्श्वभूमी ::

भारतीय संविधानाच्या भाग ४ मध्ये राज्य संस्थेने राज्य कारभार करताना अंगिकारावयाची मार्गदर्शक तत्वे नमूद केली आहेत. त्यातील अनुच्छेद ४१ अन्वये राज्य संस्थेने प्रत्येक नागरिकाला निर्वाहाचे साधन अथवा रोजगार मिळविण्याचा हक्क प्राप्त करुन देण्याबद्दल प्रयत्नशील रहावे असे सांगण्यात आले आहे. संविधानात नमूद केलेल्या या तत्वानुसार महाराष्ट्र शासनाने सन १९७२ मध्ये "१५ कलमी कार्यक्रम" तयार केला होता. त्यामध्ये रोजगार हमी योजनेचाही समावेश होता.

अंगमेहनतीचे काम करण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीला काम मिळवून देऊन स्वाभीमानाने जीवन जगण्यासारखी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. ही राज्य शासनाची रोजगार हमी योजना सुरु करण्यामागील भूमिका आहे. महाराष्ट्रातील शेतमजूरांना शेतीच्या हंगामात वर्षभरात सरासरीचे चार ते साडेचार महिने काम मिळते. शेतीचा हंगाम नसतो तेव्हा कामाअभावी त्यांची श्रमशक्ती वाया जात असते आणि काम नसते म्हणून त्यांना उपाशीपोटी रहावे लागते. वाया जाणाऱ्या श्रमशक्तीचा उपयोग करुन उत्पादक स्वरुपाच्या विकासाच्या अनेक योजना पूर्ण करणे व त्याचबरोबर शेतमजुरांना काम देऊन त्यांची उपासमार रोखणे अशा दुहेरी हेतूने राज्य शासनाने रोजगार हमी या योजनेचा अंगिकार केला.

ग्रामीण भागातील व्यक्तींना रोजगार पुरविण्याच्या उद्दिष्टांचा एक भाग म्हणून प्रथम सन १९६९ मध्ये पागे योजनेत रोजगार हमी योजनेचा समावेश करण्यात आला. ही योजना राज्याच्या विविध जिल्ह्यात प्राथमिक स्वरुपात राबविताना आलेल्या अनुभवाच्या आधारावर दिनांक २८ मार्च, १९७२ पासून ग्रामीण भागात सर्वत्र या योजनेअंतर्गत रोजगाराची हमी देऊन पुढेच पाऊल टाकण्यात आले.

योजनेच्या सुरुवातीलाच म्हणजे सन १९७२ ते १९७४ या काळात राज्यात अनेक ठिकाणी अभूतपूर्व दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आणि शासनाला रोजगार हमी योजना बऱ्याच मोठ्या प्रमाणात निलंबित करुन दुष्काळी कामे सुरु करावी लागली.

ही योजना सन १९७४-७५ मध्ये पुन: सर्वत्र नव्याने सुरू करण्यात आली व त्यायोगे संबंध देशात महाराष्ट्र राज्याने बेरोजगाराला रोजगाराची हमी मिळवून देण्याच्या दिशेने प्रथम पाऊल टाकले.

दिनांक २९ सप्टेंबर १९७४ रोजी विधानपरिषदेचे तत्कालीन सभापती माननीय श्री.वि.स.पागे यांनी राज्यातील सर्व पक्षांच्या प्रतिनिधीची एक बैठक निमंत्रित केली. या बैठकीत या योजनेसंबंधी एक सर्वसाधारण आराखडा निश्चित करण्यात आला व त्यास अनुसरुन विधानमंडळाच्या उभय सभागृहात दिनांक २० डिसेंबर, १९७४ रोजी मुख्य मंत्र्यांनी निवेदन केले. मुख्य मंत्र्याच्या या निवेदनाला उभय

सभागृहांनी एकमुखी पाठिंबा दिला. या योजनेसाठी लागणाऱ्या निधीसाठी खास कर आकारावा अशी सूचनाही या निवेदनामध्ये करण्यात आली होती.

रोजगार हमी योजनेत मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम हे सूत्र अवलंबिण्यात आले आहे. महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७, दिनांक २६ जानेवारी, १९७९ पासून अंमलात आला आणि योजनेला वैधानिक आधार प्राप्त झाला. आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक मूलगामी योजना सुरु करण्यात महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात अग्रणी राहिले आहे. या योजनेने देशातील इतर राज्यांचेसुध्दा लक्ष वेधून घेतले आहे. या योजनेनुसार अकुशल बेरोजगारांना त्यांच्या मागणीनुसार रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. उत्पादनभिमुख कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या या योजनेमुळे स्थायी स्वरुपाची संपत्ती मोठ्या प्रमाणावर निर्माण केली जात आहे.

## :: रोजगार हमी योजनेचा उद्देश व हेतू ::

सुयोग्य ग्रामीण विकासाचे धोरण आखून ग्रामीण भागातील संपत्तीच्या विकासाचा गंभीर प्रश्न सोडविणे या बाबीला नियोजनात दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी महत्व असणे आवश्यक आहे. ग्रामीण कामांचा कार्यक्रम, ग्रामीण रोजगारांचा धडक कार्यक्रम, पथदर्शी एकात्मिक ग्रामीण रोजगार कार्यक्रम, अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम यासारखे क्षेत्रविकास कार्यक्रम आणि लहान सीमांत शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण कारागीर यांना सहाय्य करण्यासाठी घेतलेले कार्यक्रम यासारखे रोजगार निर्मिती कार्यक्रम हे मर्यादित व प्रायोगिक स्वरुपात होते. म्हणून या कार्यक्रमांद्वारे ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्याचा प्रश्न परिणामकारकरित्या सुटू शकला नाही. मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पासहित मृद व जलसंधारण व ग्रामीण विद्युतीकरण हे कार्यक्रम घेण्यात आले. परंतु पुरेशा साधनसंपत्ती अभावी ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करण्याचे कामी म्हणावे तितके यश आले नाही. महाराष्ट्रातील ग्रामीण तसेच "क" वर्ग नगरपालिका परिषद क्षेत्र धरुन समाजातील गरीब वर्गाला रोजगाराची हमी उपलब्ध करुन देऊन दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी सन १९७२ मध्ये रोजगार हमी योजनेची सुरुवात करण्यात आली.

"क" वर्गीय, नगरपालिका परिषद क्षेत्र धरुन ग्रामीण भागातील कामाची गरज असलेल्या व कष्टाचे काम करण्याची तयारी असलेल्या पण स्वत:हून ते न मिळवू शकणाऱ्या सर्व अकुशल व्यक्तींना उत्पादक रोजगार मिळवून देणे हा रोजगार हमी योजनेचा मुख्य उद्देश आहे. व्यक्तीला उपयुक्त व राज्याच्या अर्थव्यवस्थेला उत्पादक असा रोजगार पुरविला जातो. कामाची हमी ही अकुशल श्रमाच्या

कामापुरती मर्यादित आहे. हाती घेतलेल्या कामातून टिकाऊ सामूहिक मालमत्ता निर्माण व्हावी व मजूरांना दिलेली मजूरी केलेल्या कामाच्या परिमाणाशी निगडीत असावी हा योजनेचा मूलभूत हेतू आहे.

**राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ च्या अंमलबजावणीनुसार दोन योजना सुरू होत्या.**

(१) ग्रामीण भागात अकुशल व्यक्तींकरिता रोजगार हमी योजना व

(२) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ कलम ७ (२) (दहा) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना.

सदरहू योजनांना राज्य शासनाच्या निधीतून अर्थसहाय्य केले जात होते.

सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम (विद्यमान नाव-महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम) लागू केला. तसेच केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पूर्वीपासून रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती.

तद्नुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पूर्वीचा अधिनियम ठेवण्याचा पर्याय स्वीकारला आहे. मात्र, राज्य विधानमंडळाने केंद्राच्या अधिनियमास अनुसरून राज्यास निधी मिळविण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपद्धतीत बदल झाला आहे.

सद्य:स्थितीत राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ पर्यंत सुधारित) अंमलात आहे व या कायद्यांतर्गत खालील दोन योजना सुरू आहेत :-

**(अ)** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र (MGNREGS) या योजनेंतर्गत केंद्र शासन १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रति कुटुंब मजूरीच्या खर्चासाठी निधी पुरविते. प्रति कुटुंब १०० दिवसांवरील मजूरांच्या मजूरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते.

**(ब)** महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ सुधारित कलम (१२) (इ) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना अनुदान तत्वावर प्रतिपूर्ती योजना म्हणून राबविण्यात येतात.

उदा :- (१) जवाहर/धडक सिंचन विहीर योजना.

(२) मागेल त्याला शेततळे योजना

या शिवाय राज्य शासनाचा निधी राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याकरिता वापरला जातो.

महाराष्ट्र शासनाने राज्य रोजगार हमी योजनेच्या नावात बदल करुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र असे नामकरण केले असून सध्या केंद्र शासनाची ही योजना राज्यात सर्वत्र राबविण्यात येत आहे.

## महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी अधिनियम १९७७ सुधारणा २००६ अंतर्गत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र :- ठळक बाबी

देशात ग्रामीण मजुरांना अकुशल रोजगाराची हमी १९७७ पासून कायद्यान्वये देणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य होते.

भारत सरकारने ग्रामीण रोजगाराचे विविध कार्यक्रम (जवाहर रोजगार एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना इ.) निधीच्या उपलब्धतेनुसार राबविले होते मात्र या कार्यक्रमात रोजगाराची हमी नव्हती. तर फक्त रोजगारांची उपलब्धता होती.

महाराष्ट्राचा रोहयो कायदा, त्याची यशस्वी अंमलबजावणी, व सद्य:स्थितीच्या अनुषंगाने अभ्यास करुन केंद्र शासनाने संपूर्ण देशासाठी दिनांक ५ सप्टेंबर, २००५ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ अंमलात आणला.

संपूर्ण देशातील ग्रामीण कुटुंबांना वित्तीय वर्षात १०० दिवस प्रती कुटुंब अकुशल रोजगाराचा हक्क प्राप्त झाला.

राष्ट्रीय अधिनियमाची अंमलबजावणी सुरूवातीला देशातील २०० जिल्ह्यांत दिनांक २ फेब्रुवारी, २००६ पासून करण्यात आली. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्रथम टप्प्यात राज्यातील १२ जिल्ह्यांचा (धुळे, नंदुरबार, अहमदनगर, औरंगाबाद, हिंगोली, नांदेड, अमरावती, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली ) समावेश करण्यात आला. तद्नंतर दिनांक १ एप्रिल, २००७ मध्ये आणखी ६ जिल्ह्यांचा (बुलढाणा, अकोला, वाशिम,ठाणे, उस्मानाबाद व वर्धा,) समावेश करण्यात आला व दिनांक १ एप्रिल, २००८ पासून महाराष्ट्रासह संपूर्ण देशात लागू करण्यात आलेली आहे.

### एकात्मक व प्रमुख कायदेशीर बाबी

केंद्राच्या अधिनियमाच्या कलम २८ प्रमाणे राज्याचा अधिनियम केंद्राच्या अधिनियमापेक्षा कमी दर्जाचा नसावा व तो केंद्रीय कायद्याशी सुसंगत असावा अन्यथा संसदेने संमत केलेला अधिनियम राज्याला आपोआप लागू होतो. त्यामुळे,

महाराष्ट्र शासनाने केंद्राच्या अधिनियमाच्या कलम २८ प्रमाणे राज्य अधिनियम सुसंगत करणे व केंद्र व राज्याच्या अधिनियमाच्या ज्या बाबी मजूरांसाठी अधिक हितावह आहेत त्या तशाच पुढे चालू ठेवणे व अशाप्रकारे राज्य कायद्यातील सुधारणा करण्याचा व अशा सुधारित राज्य अधिनियमांतर्गत

राबविण्यात येणाऱ्या योजनेस महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना संबोधण्याचा निर्णय डिसेंबर, २००५ मध्ये घेतला.

राज्याच्या अधिनियमात सुधारणा करणारा अध्यादेश दिनांक ३१ ऑक्टोबर, २००६ रोजी निर्गमित करण्यात आला.

अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर विधेयक दिनांक २९ डिसेंबर, २००६ रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहानी संमत केले व याला मा.राज्यपालांनी अधिसंमती दिली.

केंद्राच्या अधिनियमाखाली ज्या दिनांकास राज्यातील ज्या जिल्ह्याचा समावेश त्या दिनांकास सुधारित राज्य अधिनियमाच्या कलम १६(ब) त्या जिल्ह्यास लागू व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना त्या जिल्ह्यात सुरु झाली आणि माहे एप्रिल, २००८ पासून सर्व जिल्ह्यांना लागू करण्यात आली.

राज्याच्या अधिनियमांच्या सुधारणांमुळे महाराष्ट्र हे देशातील इतर सर्व राज्यांप्रमाणे केंद्रीय निधी मिळण्यास पात्र ठरले आहे.

दिनांक २६ जुलै, २०११ पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र** असे संबोधण्यात येत आहे.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे उद्दिष्ट**

अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला योजनेंतर्गत १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देण्यात आली असून, त्या माध्यमातून स्थायी स्वरूपाची मालमत्ता निर्माण करणे हे या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील शेतकरी/शेतमजुरांना या अधिनियमाच्या माध्यमातून रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे, तसेच पंचायती राज संस्थांचे बळकटीकरण करण्यावर योजनेत भर देण्यात आला आहे. जिल्हयात हाती घेण्यात येणाऱ्या सर्व कामांच्या एकूण किंमतीच्या प्रमाणात कमीतकमी ६० टक्के कामे ही, उत्पादक स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणारी असावीत व अशी कामे ही भूमी, जल व वृक्ष यांचा विकास करणारी कृषि व कृषिसंलग्न क्षेत्राशी निगडीत असावीत.

**राज्य रोहयो आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यामधील फरक**

| **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना** | **राज्य रोजगार हमी योजना** |
|---|---|
| • खर्चाच्या किमान ५० टक्के ग्रामपंचायतीमार्फत व त्यास ग्रामसभेची मान्यता | • लाईन डिपार्टमेंटकडून अंमलबजावणी ग्रामपंचायतीची भूमिका नगण्य |
| • कंत्राटदारावर बंदी | • कुशल कामाकरिता कंत्राटदारांचा वापर |

| | |
|---|---|
| • बँक/पोष्टामार्फत मजूरीचे वाटप | • रोखीने मजूरी वाटप |
| • संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन रिपोर्टिंग व संनियंत्रण | • ऑनलाईन रिपोर्टिंग नाही |
| • सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता | • सामाजिक अंकेक्षण नाही |
| • जॉब कार्डची आवश्यकता | • जॉब कार्ड बंधनकारक नाही |
| • ग्रामीण कुटुंबाला १०० दिवस रोजगाराची केंद्र शासनाद्वारे हमी व उर्वरित दिवसांसाठी राज्य शासनाची हमी | • ३६५ दिवस प्रति मनुष्य रोजगाराची हमी |
| • लेबर बजेट व जिल्हा परिषदेची मान्यता | • जिल्हाधिकारी मार्फत कामाचे नियोजन |
| • भूसंपादनाकरिता स्वतंत्र निधीची तरतूद नाही | • भूसंपादनाकरिता निधीची तरतूद |

**राज्य रोहयोंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना व**
**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत**
**वैयक्तिक लाभाच्या योजना - फरक**

| **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना** | **राज्य रोजगार हमी योजना** |
|---|---|
| (१) केंद्रीय कायद्याच्या परिशिष्ट १ मधील कलम १ (IV) प्रमाणे | (१) राज्य रोहयो कायद्याच्या कलम (१२) (इ) प्रमाणे |
| (२) योजना<br>(अ) महात्मा गांधी रा.ग्रा.रोहयो विहिरी<br>(ब) शेततळे (यंत्रसामुग्रीचा वापर न करता)<br>(क) फळबाग लागवड<br>(ड) भूसुधारणा | (२) योजना<br>(अ) जवाहर/धडक सिंचन विहिरी<br>(ब) मागेल त्याला शेततळे<br>(क) नागपूर विभागात ११००० विहिरींचा धडक कार्यक्रम |
| (३) प्रत्यक्ष कामावर येणारा खर्च शासनाकडून करण्यात येतो | (३) अनुदान पध्दतीची प्रतिपूर्ती योजना |
| (४) जॉब कार्ड आवश्यक आहे | (४) जॉब कार्ड आवश्यक नाही. |
| (५) ग्रामसभेद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते व गटविकास अधिकारी/तहसिलदार प्रशासकीय मान्यता देतात | (५) विविध स्तरावर मान्यता |
| (६) सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीकडून अंमलबजावणी | (६) विविध यंत्रणांकडून अंमलबजावणी |
| (७) यंत्रसामुग्री वापरण्यास मुभा नाही. | (७) प्रतिपूर्ती योजना असल्याने यंत्रसामुग्री वापरण्यास मुभा आहे. |

| | |
|---|---|
| (८) १५ दिवसांत मजूरी प्रदान करणे | (८) प्रतिपूर्ती योजना असल्यामुळे १५ दिवसांत अनुदान देणे बंधनकारक नाही. |
| (९) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक | (१०)राज्य शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक. |

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र ची वैशिष्ट्ये**

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्राखाली नोंदणीकृत ग्रामीण घरातील १८ वर्षावरील प्रौढ व्यक्तींना १०० दिवस प्रति कुटुंब अकुशल रोजगाराची हमी.
- नोंदणीकृत कुटुंबाला वित्तीय वर्षात किमान १०० दिवस प्रती कुटुंब केंद्रीय निधीतून अकुशल रोजगाराची हमी आवश्यक ज्यादा दिवसांसाठी राज्य निधीतून अकुशल रोजगाराची हमी.
- कायद्याच्या अंमलबजावणीची प्राथमिक जबाबदारी ग्रामपंचायतीची.
- प्रतिदिन मजूरीचे दर केंद्र शासन निश्चित करेल.
- केंद्र शासनाने ठरविलेल्या दराप्रमाणे मजूरास मजूरी मिळेल. अशा प्रकारचे दरपत्रक राज्य शासन निश्चित करेल. कामाप्रमाणे दाम. स्त्री-पुरूष समान दर.
- काम केल्यावर जास्तीत जास्त १५ दिवसात मजूरी वाटप.
- कामासाठी नाव नोंदणी केलेल्या मजूराने किमान १४ दिवस सलग काम करणे आवश्यक.
- एका ग्रामपंचायत हद्दीत काम सुरू करण्यासाठी किमान १० मजूर आवश्यक ही अट डोंगराळ भाग व वनीकरण कामासाठी शिथिलक्षम.
- मजूरीचे वाटप मजूराच्या बँक वा पोस्ट बचत खात्यात.
- गावाच्या ५ किमी परिसरात रोजगार देणे. कोणत्याही परिस्थितीत पंचायत समिती क्षेत्राबाहेर नाही.
- कामावर कंत्राटदार लावण्यासही बंदी.
- कामात किमान ६० टक्के भाग अकुशल तालुका व जिल्हा स्तरावर अकुशल-कुशलाचा हिशोब ठेवता येईल.
- मजुरामार्फत करता येण्यासारख्या कामावर मशीनरी लावण्यास बंदी.
- राज्य शासनास सल्ला देणारी महाराष्ट्र रोजगार हमी परिषद.
- सर्व माहिती कामावर, ग्रामपंचायत व वेबसाईटवर उपलब्ध करून देणार.
- कामाचे सामाजिक अंकेषण (Social audit) व पारदर्शकता.

- तक्रार निवारण.

**मजुरांची नोंदणी व जॉबकार्ड**

- रोजगार मिळविण्याकरिता जॉब कार्ड आवश्यक
- जॉब कार्डसाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज करणे आवश्यक
- १५ दिवसांत जॉब कार्ड मिळणार
- प्रत्येक कुटुंबाला विनामूल्य फोटोसह एक जॉब कार्ड
- जॉब कार्डची एक प्रत ग्रामपंचायतीमध्ये व एक प्रत कुटुंबाकडे

**कामाची मागणी व अर्ज**

- रोजगार आवश्यक असणाऱ्या नोंदणीकृत व्यक्तीने वेळोवेळी नमूना क्रमांक ४ मध्ये अर्ज करणे आवश्यक
- नमूना क्रमांक ४ ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मिळतील.
- नमूना क्रमांक ४ मध्ये अर्ज केल्यानंतर ग्रामपंचायतीने पोच पावती देणे आवश्यक.
- रोजगाराची मागणी नोंदणीकृत व्यक्ती किंवा समूह नमूना क्रमांक ४ मध्ये करू शकतो.
- मजूराने किमान १४ दिवस कामाची मागणी करणे आवश्यक.
- मागणी केल्यानंतर मजूराला १५ दिवसांत ग्रामपंचायतीने रोजगार पुरविणे आवश्यक, अन्यथा बेरोजगार भत्ता मिळेल.
- कामाच्या मागणीबाबत ग्रामपंचायतीने गटविकास अधिकारी यांना तात्काळ कळवावे.
- गावापासून ५ कि.मी. परिसरात रोजगार उपलब्ध केला जाईल अन्यथा जास्त अंतराकरिता प्रवास खर्चाची तरतूद.

**सोयी व सुविधा**

- कामाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, प्रथमोपचार, विश्रांतीसाठी शेड, ५ पेक्षा जास्त लहान मुले असल्यास दाईची सोय.
- कामाच्या अनुषंगाने मजूरास वा बरोबर आणलेल्या लहान मुलास दुखापत झाल्यास रूग्णास सर्व रूग्णसेवा शासकीय खर्चाने व दैनिक मजुरीच्या ५० टक्केपर्यंत रक्कम सानुग्रह रूग्ण भत्ता. अपंगत्व वा मृत्यू आल्यास रूपये ५०,००० पर्यंत सानुग्रह अनुदान.
- कुटुंब नियोजनाकरिता सवलती.
- मजुरीचे विलंब प्रदाने टाळण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रामार्फत ग्रामपंचायत स्तरावरुन ई-मस्टर काढण्याबाबत शासन निर्णय दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
- बँकेद्वारे अथवा पोस्टामार्फत १५ दिवसात मजुरीचे प्रदान, अन्यथा ०.०५ टक्के विलंब आकार देय.

- मजुरांना वेतन चिठ्ठीचे वाटप.

**मजूरीचे दर**

- रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना देण्यात येणाऱ्या मजुरीचा दर केंद्र शासन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ मधील कलम ६ नुसार प्रत्येक वर्षी निश्चित करते.
- केंद्र शासन प्रत्येक वर्षी मजूरीचे दर ठरविते व ते केलेल्या कामाच्या प्रमाणात (मोजमापानुसार) अदा केले जाते.
- केंद्र शासनाने सन २०११-२०१२ पासून प्रत्येक वर्षी राज्यासाठी खालीलप्रमाणे मजूरीचे दर निश्चित केले आहेत.

| **अ.क्र.** | **वर्ष** | **केंद्र शासनाने निश्चित केलेले दर (रू.)** |
|---|---|---|
| ०१ | २०११-१२ | १२७/- |
| ०२ | २०१२-१३ | १४५/- |
| ०३ | २०१३-१४ | १६२/- |
| ०४ | २०१४-१५ | १६८/- |
| ०५ | २०१५-१६ | १८१/- |
| ०६ | २०१६-१७ | १९२/- |
| ०७ | २०१७-१८ | २०१/- |
| ०८ | २०१८-१९ | २०३/- |
| ०९ | २०१९-२० | २०६/- |

**बँक/पोष्टात मजुरांची खाती :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांची मजुरी, त्यांच्या बँक/पोष्टात असलेल्या खात्यामध्ये जमा केली जाते.

**महिलांचा सहभाग :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत महिला व पुरूषांमध्ये भेदभाव न ठेवता समान मजुरीचे दर ठेवण्यात आले आहेत. योजनेमध्ये महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असणे (किमान ३३ टक्के) गरजेचे आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत जबाबदाऱ्या

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत प्रमुख जबाबदारी पंचायत राज संस्थांची असून त्यात जिल्हा परिषद, समिती, ग्राम पंचायत व ग्रामसभा यांचा अंतर्भाव आहे.

**ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्या:-**

(१) कुटुंबाची नोंदणी,
(२) रोजगार उपलब्ध करणे,
(३) ग्रामसभेच्या माध्यमातून रोजगाराच्या गरजेच्या पूर्व वार्षिक अंदाज घेणे, त्याचप्रमाणे नियोजन आराखडा व कामाचे प्राधान्य ठरविणे,
(४) सामाजिक अंकेषण (Social Audit) व पारदर्शकता,
(५) दक्षता समिती,
(६) रोजगार दिवस

**पंचायतराज संस्थांना त्यांची कायदेशीर जबाबदारी पार पाडण्यास मदत करणारे अधिकारी:-**

**जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) योजनेचे जिल्हा प्रमुख:-**

(१) सनियंत्रण,
(२) नियोजन,
(३) निधीवाटप,
(४) प्रशासकीय,
(५) मान्यता,
(६) तपासणी,
(७) माहिती समन्वयक.

**सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद):-**

(१) जिल्हा कार्यक्रम समन्वयकास मदत,
(२) नियोजन,
(३) निधी,
(४) प्रशासकीय मान्यता,
(५) तपासणी.

**कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार):-**

(१) प्रशासकीय मान्यता,
(२) तहसीलमधील नियोजन,
(३) समन्वय,
(४) वेळेवर मजूरी वाटप,
(५) सामाजिक अंकेक्षण,
(६) तक्रार निवारण,
(७) जिल्हा कार्यक्रम समन्वयाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास ते सूचित करतील. त्याचप्रमाणे कार्य करणे.

**सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी):-**

(१) प्रशासकीय मान्यता,

(२) पंचायत समिती क्षेत्रातील मग्रारोहयो संदर्भात सह जिल्हा कार्यक्रम समन्वयकास त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास ते सूचित करतील त्याप्रमाणे कार्य करणे,

(३) कार्यक्रम अधिकाऱ्यास मदत.

**कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचे अधिकारी:-**

जिल्हा कार्यक्रम समन्वयक, सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम अधिकारी, सह कार्यक्रम अधिकारी यांना त्यांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या पार पाडण्याकरिता मदत.

**ग्रामसेवक :-**

(१) ग्रामपंचायतीच्या जबाबदाऱ्या पार पाडणे

(२) निधी,

(३) अभिलेख,

(४) ग्राम रोजगार सेवक,

(५) ग्रामपंचायतीला मदतनीस.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- महाराष्ट्र अंतर्गत करावयाच्या कामांचे स्वरूप कामाची प्राधान्यता व अंमलबजावणी बाबत ठळक मार्गदर्शक तत्त्वे :**

अकुशल रोजगाराची पूर्तता, दिर्घकालीन टिकणारी कामे व त्याद्वारे सामाजिक पायाभूत सोयी उपलब्ध करून देऊन ग्रामीण जनतेचे राहणीमान उंचावेल व कायमस्वरूपी मालमत्ता तयार होईल अशा प्रकारे योजनेची अंमलबजावणी करणे.

**(अ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत कामाचे स्वरूप व प्राधन्यता (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ मधील परिशिष्ट १ नुसार) :-**

- जलसंधारण व जलसंवर्धन कामे.
- दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरण व वृक्ष लागवडीसह).
- जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सुक्ष्म जलसिंचन कामासहित).

- अनुसूचित जाती/जमाती, दारिद्र्यरेषेखालील, भुसुधार खालील व इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, लहान व सीमांत शेतकरी यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करणारी कामे, फळबाग लागवड व भूसुधार कामे.
- पारंपारिक पाणीसाठ्यांच्या योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे.
- भूविकासाची कामे.
- पूरनियंत्रण, पूरसंरक्षणाची कामे, पाणथळ क्षेत्रात चऱ्याची कामे.
- ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे.
- राजीव गांधी भवन.
- केंद्र शासनाशी सल्लामसलत करून राज्य शासनाने ठरविलेली कामे.

**(ब) परिशिष्ट १ मधील अनुज्ञेय कामांच्या यादीत समाविष्ट केलेली नवीन कामे (मे, २०१२ पासून)**

- **कृषि संदर्भातील कामे (वैयक्तिक लाभार्थी)**

  नाडेप कंपोस्टींग, गांडूळखत तयार करणे (Vermi Composting), जैविक खते (Liqid Biomanures).

- **पशुधन संदर्भातील कामे (वैयक्तिक लाभार्थी)**

  कुक्कुटपालनासाठी शेड, शेळ्या बकऱ्यांसाठी शेड, कोबा करणे (Construction of Pucca Floor), गुराढोरांकरिता युरीन टँक, चारा साठवण्याची व्यवस्था, अझोला पुरक पशुखाद्य देण्याची व्यवस्था.

- **मत्स्य व्यवसाय अनुषंगिक कामे**

  सार्वजनिक जमिनीवर मत्स्य व्यवसाय, मासे सुकविण्यासाठी क्षेत्र (Fish Drying Yards), बेल्ट व्हेजिटेशन.

- **ग्रामीण क्षेत्रात पिण्याच्या पाण्यासंबंधी कामे**

  पिण्याच्या पाण्यासाठी साठवण खड्डे (Soak Pits), पिण्याच्या पाण्यासाठी पुनर्भरण खड्डे (Recharge Pits).

- **ग्रामीण स्वच्छतेसंबंधित कामे**

  वैयक्तिक घरगुती शौचालय, अंगणवाडी व शाळेतील शौचालय व घन कचरा व्यवस्थापन.

**(क) पंचायत युवा क्रीडा आणि खेळ अभियानांतर्गत खेळाची मैदाने**

**कामाचे वार्षिक नियोजन**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत नियोजनाला महत्वाचे स्थान आहे. योजनेंतर्गत प्रत्येक वर्षी कामाचा वार्षिक आराखडा तयार करणे अनिवार्य असून त्याला लेबर बजेट संबोधण्यात येते.

**कामाचा वार्षिक आराखडा तयार करणे**

- राज्याच्या अधिनियमाच्या कलम ६, ७, २ च्या पोट-कलम (तीन) (चार) अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची असून, कलम ६, १, ६, ३(ब) व कलम १६-ब (सुधारित) नुसार राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नियोजन व कार्यवाही करण्याच्या संदर्भात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या प्रमुख यंत्रणा आहेत.
- योजनेंतर्गत मजूरांना स्थानिक पातळीवर रोजगार देण्यासोबतच गावातील पायाभूत सोयींच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या जलसंधारण, वृक्षारोपण, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती व दारिद्र्य रेषेखालील शेतकरी तसेच इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीचा विकास करणे आणि गावातील अंतर्गत रस्ते, पांदण रस्ते इत्यादी कामांचा समावेश, कामाचा वार्षिक आराखडा तयार करताना असणे आवश्यक आहे.
- कामाचा वार्षिक आराखडा तयार करताना मागील वर्षात निर्माण झालेले मनुष्यदिवस, रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटुंबांची संख्या, प्रति कुटुंब सरासरी मनुष्यदिवस निर्मिती, मजुरी दर (कुशल व साहित्यावरील खर्च) इत्यादी बाबी विचारात घेणे आवश्यक असते.
- योजनेंतर्गत पुढील आर्थिक वर्षात ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात, ग्रामपंचायतीमार्फत व इतर यंत्रणेमार्फत करावयाच्या कामाचे नियोजन करून, शेल्फवर ठेवण्याच्या कामाची यादी तयार करण्यात येते व नियोजित दिवशी दिनांक १५ ऑगस्ट रोजी ग्रामसभा घेऊन त्यामध्ये पुढील आर्थिक वर्षाच्या कामांना मंजूरी प्राप्त करून घेणे आवश्यक असते.
- योजनेंतर्गत ग्रामपंचायत व यंत्रणेमार्फत घ्यावयाच्या कामांचा प्राथम्यक्रम ठरवून ग्रामसेवकामार्फत प्रस्ताव सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) यांच्याकडे सादर केला जातो. प्रस्तावाची छाननी केल्यानंतर, तो कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) यांच्याकडे पाठविला जातो. तद्नंतर कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) त्यांच्या गटातील सर्व ग्रामपंचायतीच्या नियोजन आराखड्यांचा एकत्रित प्रस्ताव जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांच्याकडे सादर

करतात. जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांच्यामार्फत प्रस्तावाची पडताळणी केल्यानंतर, तो मंजूरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येतो. जिल्हा परिषदेकडून मान्यता मिळाल्यानंतर, जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांचेमार्फत कामाचे लेबर बजेट शासनास सादर केले जाते व शासन त्याला केंद्र शासनाची मंजुरी घेते. मंजूर केलेल्या लेबर बजेटप्रमाणे गावात योजनेंतर्गत कामे घेण्यात येतात.

## कामाचा वार्षिक आराखडा तयार करण्याकरिता वेळापत्रक :-

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| १५ ऑगस्ट | ग्रामसभेत वार्षिक आराखडा मंजूर करून घेऊन, कार्यक्रम अधिकाऱ्यांना सादर करणे. |
| १५ सप्टेंबर | कार्यक्रम अधिकारी ग्रामपंचायतीचा एकत्रित आराखडा पंचायत समितीला सादर करेल. |
| २ ऑक्टोबर | पंचायत समिती गटनिहाय वार्षिक आराखडा तयार करून, जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांना सादर करेल. |
| १५ नोव्हेंबर | जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) जिल्ह्याचा वार्षिक आराखडा व लेबर बजेट जिल्हा परिषदेला सादर करेल. |
| १ डिसेंबर | जिल्हा परिषद जिल्ह्याच्या वार्षिक आराखड्यास मंजूरी देईल. |
| १५ डिसेंबर | जिल्हा कार्यक्रम समन्वयक प्रत्येक ग्रामपंचायतीत घ्यावयाच्या कामांचे शेल्फ तयार करतील. |
| ३१ डिसेंबर | सर्व जिल्हे त्यांचे लेबर बजेट, आयुक्त नरेगा यांना सादर करतील. आयुक्त नरेगा ते शासनामार्फत केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करतील. |
| जानेवारी | केंद्र शासनाद्वारे लेबर बजेटचे परीक्षण व त्रूटींची पूर्तता करणे. |
| फेब्रुवारी | केंद्रीय प्राधिकृत समितीची बैठक व राज्याच्या लेबर बजेटला मान्यता. |
| फेब्रुवारी/मार्च | मंजूर लेबर बजेट राज्यास वितरित करणे व राज्याद्वारे महिनानिहाय व जिल्हानिहाय एम.आय.एस.मध्ये नोंद घेऊन त्याची माहिती जिल्हा, गट व ग्रामपंचायतीस देणे. |
| ७ एप्रिल पूर्वी | राज्य शासन वर्षाच्या सुरूवातीचा शिल्लक निधी केंद्र शासनास कळविल व केंद्र शासन निधीचा पहिला हप्ता राज्यास वितरीत करेल. |

## निधीचे व्यवस्थापन

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र या योजनेंतर्गत वित्तीय वर्षात कुटुंबाला १०० दिवसांची अकुशल मजूरीची हमी केंद्र शासनाने दिलेली आहे, तर १०० दिवसांवरील मजूरीची हमी राज्य शासनाने दिली आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम,२००५ च्या तरतुदीनुसार योजनेंतर्गत होणाऱ्या खर्चाचा भार केंद्र शासन व राज्य शासन खालीलप्रमाणे उचलते :-

**(अ) केंद्र शासन खालील बाबींवरील मनरेगा अंतर्गत खर्चाचा भार उचलते :**

(१) वित्तीय वर्षात कुटुंबाच्या १०० दिवसाच्या अकुशल मजूरीवरील खर्च.

(२) साधन सामुग्री, कुशल व अर्धकुशल मजुरांच्या रोजंदारीवरील एकूण खर्चाच्या ७५ टक्के खर्च.

(३) केंद्र सरकारने निश्चित केलेला ६% प्रशासकीय खर्च, यामध्ये योजनेसाठी नियुक्त केलेले कार्यक्रम अधिकारी, त्यांना सहाय्य करणारे कर्मचारी यांचे वेतन तसेच प्रशासकीय खर्चामध्ये बाह्यस्थ मनुष्यबळावरील खर्च (कंत्राटी कर्मचारी), लेखन साहित्यावरील खर्च, प्रवास खर्च, संगणकीकरण, प्रशिक्षण, सामाजिक अंकेक्षण, कामाच्या ठिकाणावरील सुविधा योजनेच्या जाहिरात व प्रसिध्दीवरील खर्च इत्यादींचा समावेश होतो.

**(ब) राज्य शासन खालील बाबींवरील खर्चाचा भार उचलते :**

(१) राज्य रोहयोकरिता वैयक्तिक लाभांच्या योजनांवरील खर्च (उदा.जवाहर/धडक सिंचन विहिरी, फलोत्पादन).

(२) नरेगा अंतर्गत १०० दिवसांवरील प्रति कुटुंबावर होणारा मजुरीचा खर्च.

(३) नरेगांतर्गत २५% कुशल खर्च.

(४) राज्यात योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी ६ टक्के प्रशासकीय खर्चाच्या व्यतिरिक्त ३ टक्के निधी प्रशासकीय खर्च म्हणून राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय राज्य शासनाने मे २०१० मध्ये घेतलेला आहे व तो आवश्यकतेनुसार जिल्ह्यांमध्ये वितरीत केला जातो.

(५) केंद्र शासनाने विहित केलेल्या मजूरी दरापेक्षा जास्त दराने अदा करण्यात येणाऱ्या मजूरीचा खर्च.

(६) मजूराने कामाची मागणी केल्यानंतर १५ दिवसांत काम उपलब्ध करू न शकल्यास देय बेरोजगार भत्त्याचा खर्च.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

## निधी असोसिएशनची स्थापना

सदरहू योजनेच्या व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वापरण्यात येणाऱ्या निधीसाठी दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना निधी असोसिएशनची स्थापना केली आहे. त्यान्वये योजनेच्या सर्व निधीचे वितरण नागपूर नरेगा कार्यालयामार्फत जिल्ह्यांना वितरित करण्यात येते. यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये योजनेसाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्यात आलेले आहे.

## मजूरी व साधन सामुग्रीवरील ६०:४० खर्चाचे प्रमाण

## (Wage & Material Ratio)

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या मजुरी व साहित्याचे प्रमाण ६०:४० निश्चित करण्यात आले आहे. म्हणजेच, अकुशल मजुरीवरील खर्च कामाच्या एकूण खर्चाच्या ६० टक्के पेक्षा कमी असू नये, तर साधन सामुग्रीवरील खर्चाचे प्रमाण ४० टक्क्यांच्या मर्यादेत राखणे आवश्यक आहे.

### कार्यक्रमाची अंमलबजावणी यंत्रणा

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता राज्यस्तरावर नियोजन विभागांतर्गत स्वतंत्र रोहयो प्रभाग असून, सचिव हे रोहयो प्रभागाचे प्रमुख आहेत. तसेच, या प्रभागाकरीता एक सह सचिव, एक उप सचिव व एक अवर सचिव, सहाय्यक संचालक (लेखा), संशोधन अधिकारी, कक्ष अधिकारी व कर्मचारी वर्ग कार्यरत आहेत.

(२) योजनेची अंमलबजावणी गतीशील होण्याच्या दृष्टीने व योग्य सनियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने नागपूर येथे आयुक्तालय स्थापन करण्यात आले असून, आयुक्त नरेगा हे आयुक्तालयाचे प्रमुख आहेत. संपूर्ण राज्याकरिता योजनेचे वार्षिक नियोजन करणे, सर्व जिल्ह्यांचे लेबर बजेट शासनास सादर करणे, निधीचे जिल्ह्यांना वितरण करणे, MIS चा नियमित अहवाल केंद्र शासनास ऑनलाईन पुरविणे इत्यादी महत्वाची कामे आयुक्तालयामार्फत पार पाडली जातात.

(३) शासन व जिल्हायंत्रणा यांच्यातील समन्वय ठेवण्याच्या दृष्टीने तसेच, योजनेच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या कार्यालयामध्ये उपआयुक्त (रोहयो) हे पद निर्माण करण्यात आले असून, या कार्यालयामध्ये आवश्यक ते अधिकारी, कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी जिल्हा पातळीपासून सुरु होत असल्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा कार्यक्रम समन्वयकाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

- यंत्रणेचे व योजनेचे सनियंत्रण, नियोजन, निधी वाटप, प्रशासकीय मान्यता, कामाची तपासणी इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या जिल्हा कार्यक्रम समन्वयक (जिल्हाधिकारी) यांच्याकडे सोपविण्यात आल्या आहेत. त्यांच्या मदतीकरिता उपजिल्हाधिकारी (रोहयो) व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत कार्यान्वित होणारी किमान ५० टक्के कामे ग्रामपंचायती मार्फत घेणे बंधनकारक असल्याने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांच्याकडे सह जिल्हा कार्यक्रम समन्वयकाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यांना सहायक म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), गट विकास अधिकारी (नरेगा) व आवश्यक अधिकारी कर्मचारी वर्ग पुरविण्यात आलेला आहे. जिल्हा कार्यक्रम समन्वयकास मदत, मजुर आराखडा (**Labour Budget**) मंजूर करुन घेणे, प्रशासकीय मान्यता, कामाची तपासणी इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मुख्य कार्यकारी अधिकारी) यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत

(५) तालुका पातळीवर या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) व सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.

- यंत्रणेमार्फत कार्यान्वित केल्या जाणाऱ्या कामास प्रशासकीय मान्यता देणे, सनियंत्रण ठेवणे, मजुरीचे प्रदान, सामाजिक अंकेक्षण, तक्रार निवारण इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या कार्यक्रम अधिकारी (तहसिलदार) यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत.

- ग्रामपंचायती मार्फत कार्यान्वित केल्या जाणाऱ्या कामास प्रशासकीय मान्यता देणे, मजुरीचे प्रदान, कामाची तपासणी, ग्रामपंचायतीकडून कामाचा आराखडा तयार करुन घेणे, योजनेबाबत जनजागृती करणे सनियंत्रण ठेवणे, मजुरीचे प्रदान, सामाजिक अंकेक्षण, तक्रार निवारण इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या सह कार्यक्रम अधिकारी (गटविकास अधिकारी) यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या आहेत.

- वन विभाग, सामाजिक वनीकरण, पाणी पुरवठा, सार्वजनिक बांधकाम, कृषी व इतर तसेच ग्रामपंचायत या यंत्रणांद्वारे या योजनेंतर्गत कामे पार पाडली जातात.

(६) ग्रामपंचायत ही योजनेची मुख्य यंत्रणा आहे. ग्रामपंचायत क्षेत्रातील मजुरांची नोंद करणे, त्यांना जॉबकार्ड वितरित करणे, हजेरी पत्रक ठेवणे, मागणीनुसार मजूरांना रोजगार उपलब्ध करुन देणे, कामाचा आराखडा तयार करणे, मजूर आराखडा तयार करणे, स्थायी स्वरुपाची मालमत्ता निर्माण करणे, योजनेविषयी जनजागृती करणे, इत्यादी महत्वाच्या जबाबदाऱ्या ग्रामपंचायतीवर सोपविण्यात आलेल्या आहेत.

- या कामी ग्रामसेवक व त्यास मदतनीस म्हणून ग्रामरोजगार सेवक यांच्यावर कामाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

(७) नरेगाच्या अंमलबजावणीत सुलभता यावी व ग्रामपंचायत / पंचायती समिती / जिल्हा परिषद यांना प्रभावीपणे काम करता यावे यासाठी बाह्यस्थ मुनष्यबळ (**Out Sourced Man Power**) घेण्यात आला आहे. यामध्ये सहायक कार्यक्रम अधिकारी (APO), तांत्रिक अधिकारी (TO), जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, **MIS** समन्वयक, लिपिक व डेटा एन्ट्री ऑपरेटर (**Clerk-Cum Data Entry Operatar**) इत्यादी बाह्यस्थ मनुष्यबळाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र या योजनेंतर्गत २९०० हून अधिक कंत्राटी कर्मचाऱ्यांची मदत घेण्यात आलेली आहे. तसेच ग्रामसेवक यांना मदतीसाठी २७, ००० पेक्षा जास्त ग्राम रोजगार सेवक कार्यरत आहेत.

## केंद्र शासनाची माहिती व्यवस्थापन कार्यप्रणाली (MIS)

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करताना पारदर्शकता राखण्याच्या दृष्टीने तसेच, सनियंत्रणासाठी केंद्र शासनाच्या MIS प्रणालीमार्फत माहिती व्यवस्थापन कार्यप्रणाली विकसित करण्यात आली आहे. या कार्यप्रणालीवर योजनेबाबतची सांख्यिकीय माहिती व योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाची माहिती देण्यात येते. यामध्ये रोजगाराची स्थिती, रोजगार पुरविण्याबाबत माहिती, विविध प्रवर्गातील कामे, लेबर बजेट, मुनष्यदिवस निर्मिती, उपलब्ध निधी, झालेला खर्च इत्यादी इत्थंभूत माहिती या कार्यप्रणालीवर उपलब्ध होते. सदर कार्यप्रणाली ही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा कणा असून, या योजनेचे यश या कार्यप्रणालीवर प्रतिबिंबीत होते. योजनेंतर्गत MIS कार्यप्रणालीमध्ये काम करण्याकरिता प्रत्येक जिल्ह्यात MIS समन्वयकाची व माहिती नोंदणीकरिता लिपिक - डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची नेमणूक करण्यात आली आहे. ही माहिती www.nrega.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## रोजगार हमी योजनेचे नवीन संकेतस्थळ

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची संगणकीय माहिती केंद्र शासनाच्या एम.आय.एस. या कार्यप्रणालीवर उपलब्ध होत आहे. परंतु योजनेंतर्गत विविध माहिती, शासन निर्णय, परिपत्रक, साप्ताहिक मजूर उपस्थिती इत्यादी सर्व माहिती एकाच संकेतस्थळावर उपलब्ध होण्याकरिता राज्य शासनामार्फत www.mahaegs.gov.in हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे.

## सामाजिक अंकेक्षण पथदर्शी प्रकल्प

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गाव पातळीवरील कामांच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता आणणे व उत्तरदायित्व निश्चित करणे यासाठी केंद्र शासनाने दि. ३० जून, २०११ च्या अधिसूचनेन्वये योजनेचे अंकेक्षण नियम २०११ तयार करुन सामाजिक अंकेक्षणाबाबत धोरण निश्चित केले आहे. या धोरणानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायत हद्दीमध्ये झालेल्या अथवा सुरु असलेल्या कामांची पाहणी व देखरेख ग्रामसभा करु शकेल तसेच या कामांचे सामाजिक अंकेक्षण करणेसाठी राज्य शासनाने सामाजिक अंकेक्षण संचालनायाची स्थापना करुन सामाजिक अंकेक्षण करण्याची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामांचे सामाजिक अंकेक्षण करण्यासाठी महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग (रोहयो) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१६/प्र.क्र.३२/रोहयो-६ अ, दि. ४ डिसेंबर, २०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य सामाजिक अंकेक्षण व पारदर्शकता सोसायटीची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर सोसायटीची नोंदणी धर्मदाय आयुक्त, मुंबई यांचेकडे करण्यात आली असून संस्था नोंदणी अधिनियम १८६० खाली दि. १७ जानेवारी, २०१८ रोजी नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

सामाजिक अंकेक्षण प्रक्रिये अंतर्गत लाभार्थी स्वत: व योजनेतील सहभागी घटक त्या योजनेचे अथवा कार्यक्रमाचे मुल्यमापन करतात. सामाजिक अंकेक्षण एक निरंतर प्रक्रिया असून लाभार्थ्यांच्या सहभागातून योजनेचे अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता व सामाजिक उत्तरदायित्व राखण्यासाठी सामाजिक अंकेक्षण आवश्यक आहे. या योजनेतील प्रत्यक्ष काम करणारे मजुर तसेच गावातील इतर नागरीक गावात झालेल्या कामांची स्वतंत्ररित्या पडताळणी करतात.

सामाजिक अंकेक्षण संचालनालयामार्फत वर्षनिहाय सन २०१३-१४ मध्ये ७२०, सन २०१४-१५ मध्ये १९४, सन २०१५-१६ मध्ये २८१, सन २०१६-१७ मध्ये ७२०,, सन २०१७-१८ मध्ये ६१४ आणि सन

२०१८-१९ मध्ये आतापर्यंत १,६४१ अशा एकूण ४,१७० ग्रामपंचायतींमध्ये सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया राबविली आहे.

## तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman)

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ मजुरांना मिळावा, त्यामध्ये पारदर्शकता असावी, मजुरांच्या तक्रारींचे निराकरण व्हावे, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, याकरिता सदरहू अधिनियमाच्या कलम २७ (१) अन्वये प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी तक्रार निवारण प्राधिकाऱ्यांची (**Ombudsman**) ची नियुक्ती करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिनांक ७ सप्टेंबर, २००९ च्या आदेशान्वये दिलेले आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक जिल्ह्यात तक्रार निवारण प्राधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. केंद्र शासनाने दिनांक २४ मे, २०१३ अन्वये सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यामध्ये तक्रार निवारण प्राधिकारी यांच्या वयाची मर्यादा ६५ ऐवजी आता ६८ वर्षांपर्यंत करण्यात आलेली आहे. तसेच त्यांच्या मानधनात रु.५००/- ऐवजी रु.१०००/- (प्रति बैठक) एवढी वाढ करण्यात आलेली आहे. त्यांचे काम समाधानकारक असल्यास त्यांना दोन वर्षांपर्यंत मुदतवाढ देण्याची तरतूद आहे. अर्जदारास तक्रार निवारण प्राधिकारी यांचे निर्णय मान्य नसल्यास अथवा सदर निर्णयाने समाधान होत नसल्यास तक्रार निवारण प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द अपिल करण्याची तरतूद आहे. सदर अपिलावर निर्णय घेण्यासाठी शासन निर्णय दिनांक २१.७.२०१४ अन्वये त्रिस्तरीय अपिलीय प्राधिकारणाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार अपिलीय प्राधिकारणातील अध्यक्ष व सदस्य यांना प्रत्येक बैठकीसाठी रु. १५००/- इतका बैठक भत्ता व रु. २९०/- इतका दैनिक भत्ता तसेच वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असलेला प्रवासभत्ता अनुज्ञेय आहे.

## महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनिमय, २००५ च्या कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य रोजगार हमी परिषदेची स्थापना करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, १९७७ च्या कलम ४ (सुधारणा २०१४) पोट-कलम (१) अन्वये याबाबत तरतूद आहे. तद्नुसार शासन निर्णय दिनांक १३ ऑक्टोबर, २०११ अन्वये महाराष्ट्र रोजगार हमी परिषदेची पुर्नरचना गठीत करण्यात आली असून परिषदेवर अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | मा.मुख्यमंत्री | - | अध्यक्ष |
| (२) | मा. उपमुख्यमंत्री | - | उपाध्यक्ष |
| (३) | मा.मंत्री (रोहयो) | - | कार्यकारी अध्यक्ष |
| (४) | मा.मंत्री (ग्राम विकास) | - | सदस्य |
| (५) | मा.मंत्री (जलसंधारण) | - | सदस्य |
| (६) | मा.मंत्री (कृषी) | - | सदस्य |
| (७) | प्रधान सचिव/सचिव (रोहयो व जलसंधारण) | - | सदस्य |
| (८) | प्रधान सचिव/सचिव (ग्राम विकास) | - | सदस्य |
| (९) | प्रधान सचिव/सचिव (नियोजन) | - | सदस्य |
| (१०) | प्रधान सचिव/सचिव (कृषि) | - | सदस्य |
| (११) | आयुक्त नरेगा | - | सदस्य |

**महाराष्ट्र रोजगार हमी परिषदेची कर्तव्ये व कामे**

(१) राज्य शासनास या योजनेविषयी आणि राज्यातील योजनेच्या अंमलबजावणीबाबत सल्ला देणे.

(२) सुचविलेली कामे निश्चित करणे.

(३) संनियंत्रण व निवारण यंत्रणेचे वेळोवेळी पुनर्विलोकन करणे आणि सुधारणा सुचविणे.

(४) अधिनियम व योजनेविषयी व्यापक प्रसार करण्यास प्रवृत्त करणे.

(५) राज्यात अधिनियम व योजना अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे आणि केंद्रीय रोजगार हमी परिषदेशी अंमलबजावणीविषयी समन्वय करणे.

(६) विधानमंडळापुढे राज्य शासनाकडून सादर करणेसाठी वार्षिक अहवाल तयार करणे.

## योजनेच्या अंमलबजावणीस चालना देण्याकरिता शासनस्तरावर करण्यात आलेल्या उपाययोजना

- योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन द्यावी तसेच, योजनेविषयी माहिती देण्यासाठी केंद्रशासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक महिन्यातील पहिल्या शनिवारी ग्रामरोजगार दिन आयोजित करण्यात येतो. ग्रामीण मजुरांना इतरही योजनांची माहिती व योजनांचे प्रत्यक्ष लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करुन दिल्यास ग्रामरोजगार दिवसाचे आयोजन अधिक लाभदायक ठरेल ही बाब विचारात घेऊन "एक दिवस मजुरासोबत" या संकल्पनेंतर्गत दिनांक ३० एप्रिल व दिनांक १ ऑक्टोबर या दिनांकास म्हणजे वर्षभरात दोनदा "ग्रामरोजगार दिनी" विविध उपक्रम, योजनेंतर्गत मोठया प्रमाणावर हाती घेण्यात आलेली व मोठया प्रमाणात मजुर उपस्थिती असलेली गावे तसेच, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडण्यात आलेली गावे यामध्ये आयोजित करण्याचा निर्णय शासनाने घेतला. सदरील उपक्रमांतर्गत योजनेची माहिती व कामे, वैयक्तिक लाभाच्या योजना, जनजागृतीच्या योजना यांचा समावेश करण्यात आलेला आहे.
- महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ मधील कलम २ (म-१) नुसार ग्रामीण क्षेत्राच्या व्याख्येत "क" वर्ग नगरपरिषद क्षेत्राचा समावेश होते. दिनांक ३ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयानुसार संपूर्ण राज्यात "क" वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (सुधारणा २०१४) अन्वये "क" वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रात राज्य रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत संपूर्ण राज्यात राबविण्यास तसेच रेशीम किटक संगोपन गृहाचे बांधकाम करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
- योजनेंतर्गत कृषि विभागामार्फत भूस्तराप्रमाणे शेततळे खोदण्याचा कार्यक्रम अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या/विमुक्त जमाती, दारिद्रय रेषेखालील इतर कुटुंबे, महिलाप्रधान/शारिरिक अपंगत्व प्रधान असलेली कुटुंबे, भुसूधार योजनेचे लाभार्थी, इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी इत्यादी प्रवर्गातील लाभधारक शेतकऱ्यांच्या शेतात राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ (नरेगा) ऑपरेशनल मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद १०.१२ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, या कार्यक्रमांतर्गत कामे सुरु

असतांना, कामांची प्रगती आणि गुणवत्ता यांच्या संनियंत्रणाखाली जिथे कामे चालू आहेत तेथील स्थानिक लोकांचा सहभाग असलेली ग्रामपंचायत स्तरावर स्थानिक देखरेख व दक्षता समिती गठीत करण्यातचे निर्देश आहेत. त्यानुसार नरेगांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर देखरेख व दक्षता समिती गठीत करण्यात आली आहे.

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभ मजूरांना मिळावा, त्यामध्ये पारदर्शकता असावी, मजुरांच्या तक्रारींचे निराकरण व्हावे, त्यांच्यावर अन्याय होऊ नये याकरिता सदर कायद्याच्या कलम २७ च्या पोट-कलम (१) नुसार प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी **Ombudsman** ची नियुक्ती करण्यात आली आहे.
- 'क' वर्ग नगरपरिषदेत व नगरपंचायत क्षेत्रात रोजगार हमी योजनेंतर्गत कामाची मागणी प्राप्त झाल्यास तेथे योजना राबविण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
- योजनेंतर्गत पारदर्शकता वाढीस लागण्याच्या दृष्टीने तसेच मजूरांच्या कामाची अचूक नोंद हजेरीपटावर होऊन मजूरी वाटप जलदगतीने होण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्यात हस्तलिखीत हजेरीपत्रकाऐवजी इलेक्ट्रॉनिक हजेरी पत्रक (ई-मस्टर) अंमलात आणण्यात आले आहे.

**ई-मस्टरचे फायदे**

⇒ कामकाज सुलभ व सोपे झाले.

⇒ सुरु असलेल्या कामांची संख्या, मजूर उपस्थिती, कामाचा प्रकार इत्यादी माहिती मिळणे सोपे झाले.

⇒ कामाचा कालावधी, आवश्यक हजेरीपत्रक संख्या यांचा ताळमेळ घालणे सोपे झाले.

⇒ काम पूर्ण होऊन मजूरांना मजूरी वेळेत अदा होण्यास मदत झाली.

⇒ MIS वेळीच पूर्ण करण्यासाठी नियंत्रण ठेवता आले.

- योजनेंतर्गत मजूरांना मजूरी वेळेत मिळण्याच्या दृष्टीने उपयुक्त अशी EFMS (Electronic Fund Management System) ही कार्यप्रणाली सुरु करण्यात आली असून, प्रायोगिक तत्वावर पुणे, नंदुरबार, वर्धा व अमरावती या जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आली व येत्या वर्षात उर्वरित जिल्ह्यांत लागू करण्यात येईल.
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्रांतर्गत जॉबकार्ड नूतनीकरण करण्याची विशेष मोहीम घेण्यात आली.

- केंद्र शासनाने अनुज्ञेय केलेल्या नवीन ३० कामांचा समावेश योजनेंतर्गत करण्यात आला.
- पंचायत युवा क्रीडा आणि खेळ अभियांनांतर्गत खेळाची मैदाने निर्माण करणे या कामांचा योजनेंतर्गत समावेश करण्यात आला.
- योजनेंतर्गत विहिरीची कामे अत्यंत लोकप्रिय आहेत. मजूरी दरात व विहिरीच्या कामासाठी लागणाऱ्या साहित्याच्या दरात झालेली वाढ विचारात घेऊन, राज्य शासनाने विहिरीच्या कामासाठी लागणारी खर्चाची मर्यादा रुपये २ लाखावरुन रुपये ३ लाखापर्यंत वाढविली आहे.
- योजनेंतर्गत प्रत्येक दुष्काळी जिल्हे किंवा ज्या जिल्ह्यात मजूरांची कामाची मागणी आहे, अशा जिल्ह्यातील दहा ते पंधरा ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात (साधारणपणे ५,००० ते ७,५०० हेक्टर क्षेत्र) पाणलोट क्षेत्र विकसित करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच सदर पाणलोट विकासाचे काम एक पथदर्शी प्रकल्प म्हणून राज्यातील १५ जिल्ह्यात एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत स्वयंसेवी संस्थांच्या तांत्रिक सहकार्याने राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
- योजनेंतर्गत अनुसचित जमाती राहत असलेल्या ठिकाणची पडीक जमीन लागवडी योग्य करण्यासाठी डोंगराळ भागात / पडकईंतर्गत दगडी बांधासह मजगीची काम घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## योजनेची फलनिष्पत्ती

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र ही योजना राज्यात दिवसेंदिवस लोकप्रिय ठरत आहे. या योजनेंतर्गत नाविन्यपूर्ण कल्पक नियोजन व अंमलबजावणी केल्याने जसे की, क्षेत्रीय स्तरावरील कार्यान्वयीन यंत्रणांमध्ये व्यापक जागृती, कर्मचाऱ्यांचे प्रभावी प्रशिक्षण, कार्यपध्दतीचे सुलभीकरण, प्रशासकीय सुधारणा, एम.आय.एस. बळकटीकरण, बाह्यस्थ मनुष्यबळाची नेमणूक इत्यादी केल्याने योजनेचा पूर्णत: कायापालट झाला व ही योजना सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचली आहे. सदर योजनेंतर्गत रोजगार पुरविणे, त्यानुषंगाने जीवनमान सुरक्षा प्रदान करणे व चिरस्थायी मालमत्ता निर्माण करणे या उद्दिष्टांच्या अनुषंगाने गावांचा संपूर्ण विकास होऊ शकतो. या योजनेच्या माध्यमातून गावे स्वयंपूर्ण करुन ग्रामीण भागाच्या विकासाच्या मुलभूत संकल्पनेस चालना मिळत आहे. ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक जीवनमानात कायापालट होण्याकरीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र ही योजना निश्चितच उपयुक्त ठरत आहे.

- या योजनेंतर्गत पुरुष व महिला मजुरांना समान मजूरी अदा करण्यात येते, त्यामुळे स्त्री-पुरुष भेदभाव नष्ट होण्यास चालना मिळते.
- योजनेंतर्गत मजुरांना स्थानिक ठिकाणी कामे मिळत असल्याने कामासाठी स्थलांतरीत होण्याच्या प्रमाणात घट झालेली आहे.
- ई-मस्टर व ई.एफ.एम.एस. (Electronic Fund Management System) मुळे योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांच्या बँक/पोष्ट खात्यावर १५ दिवसात मजुरी जमा करणे शक्य झाले आहे.
- योजनेंतर्गत कामाची मागणी, तक्रार नोंदविण्याकरिता मदतवाहिनी (Helpline-१८०० २२३८३९) सुरु करण्यात आलेली आहे. यामुळे मजुरांना घरबसल्या कामाची नोंदणी करणे शक्य झाले आहे.

## :: रोजगार हमी योजना समिती ::

### (१) रोजगार हमी योजना समितीची स्थापना :-

रोजगार हमी योजनेखाली श्रमिकांना शासनाने उपलब्ध केलेल्या सोयी सवलतीचा कितपत लाभ होतो, योजनेचा श्रमिकावर काय परिणाम होतो व योजनेचे उद्दिष्ट साधण्याच्या दृष्टिने काय करणे आवश्यक आहे यासंबंधी शासनास सूचना करण्याच्या हेतूने दिनांक १३ ऑगस्ट, १९७५ रोजी विधानसभा आणि विधानपरिषद या दोन्ही सभागृहाने संमत केलेल्या प्रस्तावानुसार महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४१ आणि महाराष्ट्र विधानपरिषद नियमावलीतील नियम २१३ अन्वये विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सदस्यांची रोजगार हमी योजना समिती प्रथम दिनांक १३ ऑगस्ट, १९७५ रोजी गठित करण्यात आली.

सुरुवातीला या समितीची सदस्य संख्या विधानसभेचे ११ व विधानपरिषदेचे ४ अशी मिळून १५ होती. सन १९८१-८२ पासून विधानसभेचे २० आणि विधानपरिषेदेचे ५ अशी मिळून २५ करण्यात आली आहे. मा.अध्यक्ष आणि मा.सभापती या समितीवरील सदस्यांना नामनियुक्त करतात.

मा.अध्यक्ष विधानसभा समितीच्या सदस्यांमधून एका सदस्याची समिती प्रमुख म्हणून नियुक्ती करतात.

समितीचा पदावधी सर्वसाधारणपणे एक वर्षाचा असून नवीन समितीची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती होईपर्यंत तिला अधिकारावर राहता येते. समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतात.

**(२) रोजगार हमी योजना समितीच्या स्थापनेबाबतचे प्रस्ताव :-**

दोन्ही सभागृहांची रोजगार हमी योजना समिती स्थापन करण्यासंबंधी **मा.मुख्य मंत्र्यांचा प्रस्ताव.**

(दिनांक १३ ऑगस्ट, १९७५ रोजी विधानसभेने संमत केलेला प्रस्ताव.)

"रोजगार हमी योजना समिती" या नावाची दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक समिती गठित करुन त्यामध्ये, अध्यक्षांनी नामनिर्दिष्ट करावयाचे विधानसभेचे ११, आणि सभापतींनी नामनिर्दिष्ट करावयाचे विधानपरिषदेचे ४ असे एकूण १५ सदस्य राहतील. तिचे उद्देश पुढीलप्रमाणे असतील. मा.अध्यक्ष समितीच्या सदस्यांपैकी एका सदस्याला समिती प्रमुख म्हणून नामनियुक्त करतील.

(१) राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेनुसार रोजगार मिळालेल्या लोकांना मिळालेले फायदे व त्या लोकांवर सदरहू योजनेचा झालेला परिणाम यांच्या विशेष संदर्भात सदरहू योजनेचे निर्धारण व मुल्यमापन करणे आणि या योजनेत काही त्रुटी व दोष असल्यास ते शोधून काढणे व ते दूर करण्यासाठी सदरहू योजनेत सुधारणा करण्याचे उपाय सुचविणे आणि ;

(२) या योजनेतील कामे अधिक चांगल्या रीतीने पार पडावीत आणि सदरहू योजनेत अभिप्रेत असलेली अत्युत्कृष्ट फलिते मिळावी म्हणून सर्वसाधारणपणे शिफारशी करणे.

समितीचे सदस्य समिती गठित झाल्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीपर्यंन्त आपली पदे धारण करतील.

इतर सर्व बाबतीत समितीच्या कामकाजाशी संबंधित असे विधानसभेचे कार्यपध्दतीविषयक नियम मा. अध्यक्षांनी त्या केलेल्या फेरबदलानुसार किंवा सुधारणानुसार लागू होतील.

विधानपरिषदेने देखील या समितीच्या कामकाजात सहभागी व्हावे अशी शिफारस हे सभागृह विधानपरिषदेला करीत आहे.

(२) उभय सभागृहांची रोजगार हमी योजना समिती स्थापन करण्यासंबंधी **विधान कार्य मंत्र्यांचा प्रस्ताव.**

(दिनांक १३ ऑगस्ट १९७५ रोजी विधानपरिषदेने संमत केलेला प्रस्ताव)

"रोजगार हमी योजना समिती" या नावाची दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक समिती गठित करुन, त्यामध्ये अध्यक्षांनी नामनिर्दिष्ट करावयाचे विधानसभेचे ११, आणि सभापतींनी नामनिर्दिष्ट करावयाचे विधानपरिषदेचे ४, असे एकूण १५ सदस्य राहतील. तिचे उद्देश पुढीलप्रमाणे असतील. मा. अध्यक्ष समितीच्या सदस्यांपैकी एका सदस्याला समिती प्रमुख म्हणून नामनियुक्त करतील.

(१) राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेनुसार रोजगार मिळालेल्या लोकांना मिळालेले फायदे व त्या लोकांवर सदरहू योजनेचा झालेला परिणाम याच्या विशेष संदर्भात सदरहू योजनेचे

निर्धारण व मूल्यमापन करणे आणि या योजनेत काही त्रुटी व दोष असल्यास, ते शोधून काढणे व ते दूर करण्यासाठी सदरहू योजनेत सुधारणा करण्याचे उपाय सुचविणे, आणि

(२) या योजनेतील कामे अधिक चांगल्या रीतीने पार पडावीत आणि सदर योजनेत अभिप्रेत असलेली अत्युत्कृष्ट फलिते मिळावी म्हणून सर्वसाधारणपणे शिफारशी करणे.

समिती सदस्य समिती गठित झाल्यातारखेपासून एक वर्षाच्या कालावधीपर्यंत आपली पदे धारण करतील.

इतर सर्व बाबतीत समितीच्या कामकाजाशी संबंधित असे विधानसभेचे कार्यपध्दतीविषयक नियम, मा. अध्यक्षांनी त्यात केलेल्या फेरबदलानुसार किंवा सुधारणेनुसार लागू होतील, आणि

ज्याअर्थी, विधानसभेने दिनांक १३ ऑगस्ट, १९७५ रोजी ठराव पारित करुन हया सभागृहाचे सदरहू समितीच्या कामकाजात सहभागी व्हावे अशी शिफारस केली आहे. त्याअर्थी हे सभागृह त्या समितीच्या कामकाजात सहभागी होण्यासाठी याद्वारे आता ठराव करीत आहे.

## महाराष्ट्र विधानसभा नियम (२४१)

### (३) रोजगार हमी योजना समितीची रचना (म.वि.स. नियम, २४१)

(१) प्रत्येक वर्षी, विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा, यथास्थिती, नवीन रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, रोजगार हमी योजना समितीची रचना करण्यात येईल.

(२) समिती ही पंचवीसपेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून होईल, त्यापैकी वीसपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य, विधानसभेच्या सदस्यांमधून अध्यक्षाद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील आणि पाचपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य विधानपरिषदेच्या सदस्यांमधून तिच्या सभापतीद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील.

(३) समितीचे सदस्य, नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

### (४) रोजगार हमी योजना समितीची कामे (म.वि.स. नियम, २४२)

(१) समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील :-

(एक) राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेअन्वये कामावर असलेल्या लोकांना मिळालेले फायदे व त्यांच्यावर झालेला परिणाम यांच्या संदर्भात उक्त योजनेच्या कामकाजाचे विशेषकरुन परीक्षण करणे, तत्संबंधात अंदाज घेणे आणि मूल्यमापन करणे, तसेच त्याबाबतीत कोणत्याही त्रुटी वा उणिवा असल्यास, त्या शोधून काढणे व त्या दूर करण्यासाठी आणि उक्त योजनेत सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचवणे; व

(दोन) समितीचे कामकाज अधिक चांगले चालविण्यास हितावह ठरतील अशा सर्वसाधारण शिफारशी करणे व त्या शिफारशींद्वारे योजनेची उद्दिष्टे अधिकाधिक प्रमाणात साध्य करणे.

**महाराष्ट्र विधानपरिषद नियम (२१३)**

**(२) नियमाप्रमाणे दिलेली कामे साध्य करण्यासाठी समितीला प्रामुख्याने दोन बाबींचा अभ्यास करावा लागतो.**

**(एक)** राज्याच्या महसूल विभागीय ठिकाणी बैठकी घेऊन विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व ही योजना राबविणाऱ्या कार्यान्वयीन यंत्रणेतील प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत रोजगार हमी योजनेच्या धोरणात्मक बाबी आणि ही योजना राबविताना त्यांना येणाऱ्या अडचणी यासंबंधात त्याच्याशी चर्चा करणे, यासाठी विभागीय बैठकीची प्रश्नावली तयार करुन नियोजन (रोहयो) विभागामार्फत सर्व विभागीय आयुक्त यांना पाठविली जाते व त्यासंदर्भात विभागीय आयुक्तांकडून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने समिती विभागीय बैठकीच्या वेळी चर्चा करते.

**(दोन)** विभागीय बैठकीचा कार्यक्रम संपल्यानंतर समिती जिल्ह्यांना भेट देत असते. हा जिल्हा बैठकीचा कार्यक्रम दोन दिवसांचा असतो. जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी जाऊन समिती कामावरील मजूरांसमवेत चर्चा करते व मजूरांना मिळणाऱ्या सोयी सवलती व मजुरी संदर्भात त्यांच्या अडीअडचणी जाणून घेते. दुसऱ्या दिवशी समितीची बैठक जिल्ह्याच्या ठिकाणी होत असते. या बैठकीत जिल्हाधिकारी व जिल्ह्यातील कार्यान्वयीन यंत्रणेचे अधिकारी यांचे समवेत समिती सदस्यांना कामावरील भेटीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटी तसेच जिल्हा बैठकीच्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली माहिती यासंदर्भात चर्चा केली जाते.

**(तीन)** विभागीय व जिल्हा बैठकीनंतर सदर बैठकीत आढळून आलेल्या त्रुटी व महत्त्वाच्या मुद्यांबाबत प्रश्नावली तयार करुन मंत्रालयीन विभागाच्या संबंधित सचिवांची साक्ष घेण्यात येते व त्या अनुषंगाने योजनेत सुधारणा होण्याच्या दृष्टीने अहवाल तयार करुन तो समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात येतो. समितीने मान्यता दिल्यानंतर सदर अहवाल मुद्रित करुन सभागृहास सादर करण्यात येतो.

समितीच्या वरील कामाव्यतिरिक्त मागील समितीने सभागृहास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाही संबंधात मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीवर समिती विचार करते. आवश्यकता वाटल्यास मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची पुन्हा साक्ष घेण्यात येते.

व तद्नंतर त्यासंबंधीचा अनुपालन अहवाल तयार करुन समितीने मान्यता दिल्यानंतर सभागृहास सादर करण्यात येतो.